दि.१२.०९.२५.

**अहवाल**

**टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे**

**जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन.**

दिनांक १० सप्टेंबर २०१५ रोजी जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाचे औचित्य साधून टिळक आयुर्वेद महाविदयालय, पुणे येथे जनजागृतीपर परिसंवाद /चर्चासत्राच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमामध्ये महाविदयालयाच्या प्राचार्य डॉ सरोज पाटील, उपप्राचार्य डॉ. मिहीर हजरनवीस व डॉ. घनश्याम डोंगरे यांनी मुलांशी आत्महत्या या संवेदनशील विषयावर संवाद साधून मुलांचे मनोबल वाढवले. संवादामध्ये नकारात्मक विचार काढून सकारात्मकतेची ऊर्जा दिली व कोणत्याही प्रकारचे ताणतणाव अथवा समस्या निर्माण झाल्यास शिक्षक, विश्वासातील व्यक्ती यांच्याशी संवाद साधण्यासाठी प्रवृत्त केले.

मुलांना मानसिक स्वास्थाचे महत्त्व सांगताना एक छोटी प्रश्नमंजुषा घेऊन वातावरण उत्याही करण्यात आले.

आत्महत्येची कारणे काय असू शकतात आणि त्यावर कोणते प्रतिबंधक उपाय असू शकतात यासाठी मुलांना शीघ्र निबंध लेखन घेण्यात आले. तसेच आत्महत्या प्रतिबंध या विषयावरची घोषवाक्य स्पधी घेण्यात आली. यानंतर सर्व मुलांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विदयापीठाशी संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या मानसिक आरोग्य समस्यांसाठी विद्यापीठाव्दारे निर्मित 'मनसंवाद' हेल्पलाईन बददल माहिती व ८४८५०९२३५० हा संपर्क क्रमांक देण्यात आला. या क्रमांकावर संपर्क साधून मोफत समुपदेशनाचा लाभ घेण्याचे आवाहन देखील करण्यात आले

या कार्यक्रमामध्ये 160 विद्यार्थीनी आपला सहभाग नोंदवला.

डॉ. मैथिली नाईक, डॉ. गौरी गांगल व डॉ. सुप्रिया गोरे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. अशाप्रकारे 'Changing the Narrative on suicide' या संकल्पनेवर आधारीत जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन दि.१०.०९.२५ रोजी टिळक आयुर्वेद महालिदयालयामध्ये साजरा करण्यात आला.

टिळक आयुर्वेद महाविद्यालय पुणे-११

प्रभारी प्राचार्य

टिळक आयुर्वेद महाविद्यालय,पुणे-११







टिळक आयुर्वेद महाविद्यालय पुणे-११

प्रभारी प्राचार्य
टिळक आयुर्वेद महाविद्यालय,पुणे-११